## उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३८ /२०२६ दि. ११ /०२/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी, उल्हासनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत शिव मंदिर, पवई चौक येथे **'महाशिवरात्री'** निमित्त सालाबादप्रमाणे महाशिवरात्रौत्सव साजरा करण्यात येतो. गतवर्षीप्रमाणे यावर्षी **दिनांक १५/०२/२०२६ रोजी 'महाशिवरात्री'** निमित्ताने शिवमंदीर, पवईचौक येथे मोठया प्रमाणात शहरातील भाविक दर्शनाकरीता येत असतात. त्यामुळे शास्त्री चौक ते पवई चौक या दरम्यान रस्त्यावर दोन्ही बाजुस मिठाई, खेळणी, इतर मनोजरंन व शोभेच्या वस्तु विकणारे विक्रेते बसत असल्याने सदर भागास जत्रेचे स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** शास्त्री चौकातुन पवई चौक कडे अशा दोन्ही बाजूनी येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शास्त्री चौक व पवई चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** १) शास्त्री चौकातुन पवई चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही डर्बी चौक – स्मशानभुमी चौक येथुन पुढे इच्छित स्थळी जातील.

२) पवई चौकातुन शास्त्री चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही पवई चौक – रिलायन्स पेट्रोलपंप – हडकमई माता चौक येथुन पुढे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दि. १५/०२/२०२६ रोजी सकाळी ०६:०० वा. ते रात्रौ २३.०० वाजे** पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ४, उल्हासनगर
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
सहा. पोलीस आयुक्त, अंबरनाथ विभाग/वाहतुक शाखा, उल्हासनगर
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण